स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गतअर्थशास्त्र विषयातपीएच.डी. (Ph.D)

पद्वीसाठी सादर केलेला संशोधनाचा आराखडा(Synopsis).

‘महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास’

(२०१०-११ ते २०१९-२०)

संशोधक

गंगाधर लक्ष्मणराव गायकवाड

एम.ए. एम.फिल. (अर्थशास्त्र)

शास्त्रीनगर बालक मंदीर पुर्णा ता. पुर्णा, जिल्हा. परभणी

मार्गदर्शक

प्रा.डॉ. शिवाजी पाते

सहयोगी प्राध्यापक, संशोधक मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभागप्रमुख

संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी

एप्रिल 2019

महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास(२०१०-११ ते २०१९-२०)

प्रस्तावना :

कार्ल मार्क्सने १८६४ ला लंडन मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना करून कामगारां सोबत होत असलेल्या भेदभाव बाबतीत वाचाफोडली त्यांनी कामगारांना उपदेश देताना ''दुनिया के मजदूरो के पास अपनी जंजीर के अलावा खोने के लिऐ कुछ भी नही है दुनिया के मजदूर एक हो।'' तसेच कामगाराच्या शोषणा विषयी बोलताना''पूंजीमृत श्रम है जो पिशाच की तरह है जो केवल श्रम चुसकर ही जिंदा रहता है और जितना अधिक जिता है उतना ही चुसता है।''

जागतिक औद्योगिक संबंधीत मालक, व्यवस्थापन व कामगार ह्यांचा सामुदायिक संबंध आहे,कामगारांच्या आरोग्याचे, सुरक्षिततेचे व कल्याणाचे संवर्धन करणे,मालक व कामगार तसेच त्याच्या संघटना यातील वैध संबंध व कार्य ठरविणे, औद्योगिक कलहाची तडजोड घडवून आणने आणि ज्या ठिकाणी मालक संघटना स्वेच्छा किंवा कामगार संघटनाच्या न्याय मागण्यांना अनुसरून किमान वेतनाप्रमाणे व कामाची परिस्थिती ह्याचे योग्य निकष ठरवितनाही, तेथे ते ठरविणे ह्या हेतूसाठी शासन औद्योगिकसंबंध क्षेत्रात उतरले याशिवाय सरकारी क्षेत्रातील आणि राष्ट्रीयकृत उद्योगधंदे यामधील औद्योगिक संबंधाच्या क्षेत्रात शासन हे मालक म्हणून प्रत्यक्ष भाग घेते.कित्येक देशात शासन हे मालक संघटना व कामगार संघटना ह्यांच्या त सल्लागारीसंबंध प्रस्थापित करते. पहिल्या महायुध्दाच्या अखेरीच्या काळात मालक- कामगार समित्या स्वेच्छेने ग्रेटब्रिटन, फ्रान्स व इत्यादी देशात विभागसंयंत्र आणि उद्योग यामध्ये प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरांवर स्थापन करण्यात आल्या. ग्रेटब्रिटनमध्ये व्हिटली समितीच्या शिफारशीनुसार औद्योगिक संबंधामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मालक कामगार समित्या स्थापन झाल्या.

अमेरिकेत १९३३ चानॅशनलइंडस्ट्रियल रिकव्हरीॲक्ट व १९३५ चा नॅशनल लेबर रिलेशन्स (वॅग्नर) ॲक्ट हे दोन अधिनियम म्हणजे अमेरिकेच्या औद्योगिक संबंधाच्या इतिहासाला वळण देणारे ठरले. या ॲक्ट ने कामगारांना संघटना बनविण्याचा,त्यांच्यात सामील होण्याचा व त्यांना सहाय्य करण्याचा हक्क देण्यात आले,त्याचप्रमाणे कामगारांना स्वहिता संबंधीच्या मागण्यांसाठी आपण निवडलेल्या प्रतिनिधी मार्फत मालकांशी सामुदायिक वाटाघाटी करण्याचा हक्क मिळला तसेच १९३५ चा सामाजिकसुरक्षा अधिनियम व १९३८ चा उचित श्रमाणन अधिनियम यांच्या सामाजिकसुरक्षा कार्यात सुधारणा करण्यात येऊन त्याची व्याप्तीही वाढविण्यात आली १९४७ च्या कामगार व्यवस्थापन संबंध (टॉफ्ट- हार्टली) अधिनियमान्वये शासनाने औद्योगिकसंबंध क्षेत्रात आणखी एक पाऊल टाकले व कामगारांना संघटनांचा त्याच्यावरील जबाबदारीची जाणीव करून दिली.

भारतातील कामगाराची स्थिती पाहिली असता पहिल्या महायुध्दाच्या सुरूवाती पर्यंत औद्योगिक कामगाराच्या संबंधात शासनाला विशेष विचार करावा लागला नाही. पहिल्या महायुध्दाच्या काळा पर्यंत कामगारांची खुप पिळवणूक व छळवणूक झाली.मजुरीचे दर अतिशय अल्पहोते; कामाच्या तासावर नियंत्रण नव्हते, कारखान्यामध्ये अपशब्दाचा वापर होत असे या अन्यायांच्या प्रतिकारार्थ कामगार कधी-कधी संप करीत असे,कामगाराच्या संघटना नव्हत्या व सरकारी कायदेही नव्हते त्यामूळे औद्योगिक संबंधाच्या बाबतीत त्याकाळात कारखानादाराना अनियंत्रित सत्ता होती. त्यावेळी भारत सरकारने इंग्लंड सरकारशी भारतीय कामगाराच्या हितार्थ १८८१ मध्ये कारखान्या बद्दल पहिला कायदा पास केला या अंतर्गत कामाचे तास कमी केले आणि बायका व मुले यांना नोकरीवर ठेवण्याच्या बाबतीत काही निर्बंध लादण्यात आले,परंतू प्रत्यक्ष मात्र भारत सरकारने कोणत्याही प्रकारचे कामगारांच्या हितासाठी पाऊल उचलले नाही.

भारतात कामगार संघटना कायदा १९२६ ला मंजूर झाला असला तरी त्याचा फायदा कामगारांना झाला नाही. कारण उद्योगपती त्याची दखल घेत

नसे. उलटत्या संघटनाचा बिमोड करण्याचाच त्याचा प्रयत्न होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ मध्ये स्वतंत्र मजूरपक्षाची स्थापना केली. भारतातील सव 'प्रकारच्या कामगारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १२-१३ फेब्रुवारी १९३८ च्या मनमाड येथील दलितवर्ग कर्मचारी परिषदेतील भाषणात, ''ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगाराचे दोन शत्रू आहेत'' असे संबोधले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना स्वातंत्रोत्तर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते.त्यांन ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्यामोर्च्यातील घोषणा ''ये आझादी झुठी है देश की जनता भुखी असा संदेश दिला'' १९५८ मध्ये बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात कामगारा विषयी बोलता नात्यांनी ''पृथ्वीही शेषनागाच्या मस्ताकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहाता वर तरलेली आहे''असे सांगून यातून त्यांनी जागतिक संरचनामध्ये दलित आणि कामगारवर्गाचे महत्व स्पष्ट केले.

महाराष्ट्र हे भारतातील पश्चिमभागातले एक राज्य आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र भारतातील तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्र हे भारतातील सर्वात विकसनशील राज्यांपैकी एक आहे. महाराष्ट्र राज्याची सीमा गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा आणि दादरा आणि नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे. राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राची किनारपट्टी आहे. जवळपास ११ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. मुंबईत साधारणतः १.८ कोटी लोक राहतात. नागपूर शहर महाराष्ट्राची उपराजधानी आहे. चीन व मध्ययुगीन महाराष्ट्र सातवाहन राजवंश, राष्ट्रकूट राजवंश, पश्चिम चालुक्य मुघल आणि मराठ्यांच्या साम्राज्याचा समावेश आहे. विस्तार १,१८,८०९ चौरस मैल (३,०७,७१० चौरस किमी) असून तो पश्चिम आणि कर्नाटक, तेलंगणा, गोवा, गुजरात, छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि दादरा आणि नगर- हवेली या भारतीय राज्यांना अरबी समुद्रलागून आहे. महाराष्ट्र हा फुलें, शाहू आणि

आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. कारण महाराष्ट्राला समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभलेला आहे.

जनगणना २०११ नुसार महाराष्ट्रात ११.२४ कोटी लोकसंख्या होती त्यापैकी ५४.७८% ग्रामीण भागात असून ४५.२२% शहरी भागात होती,राज्यात दरवर्षी १६% ने लोकसंख्या वाढत असून स्त्री-पुरूषाचेप्रमाण ९२९ असे होते. या राज्यात १२५.६९% शेतकऱ्यांची संख्या असून अनुसूचित जाती-जमातीच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी २१.१७% दिसून येते.तसेच २३.३२% लोक हे झोपडपट्टीत राहतात. एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२.३४ होते यात पुरूषाचेप्रमाण ८८.३८% तर महिलाचे ७५.८७% होते तसेच राज्यात १७.३५% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते.

जनगणना २०११ नुसार महाराष्ट्र राज्यात ४.९४ कोटी कामगार होते त्यामध्ये स्त्रियांचेप्रमाण ३४% होते तर देशाच्या कार्यसहभागात ३९% स्त्रियांचे असून कार्यसहभाग दरानुसार देशातील प्रमुख राज्यामध्ये आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, नंतर महाराष्ट्र चौथ्या स्थानावर असून राज्याचा कार्य सहभाग दर ४४% आहे.राज्यात साक्षरव्यक्तीचा कार्यसहभाग दर ८७.९% तर निरक्षर व्यक्तीचा ३७.७% होता. मुख्य निरक्षर कामगार २०.३% (पुरूष - १३.३ व महिला- ३५.४%) आणि साक्षर मुख्यकामगार ७९.९%(पुरूष - ८६.७ व महिला- ६४.६%) होते तसेच सिमांतिक निरक्षर कामगार ५७.१% (पुरूष - १६.८ व महिला- ३६.०%) व साक्षर सिमांतिक कामगार ७२.९% (पुरूष - ८३.२ व महिला- ६४.०%) होते.

कार्य सहभागाच्या बाबतीत राज्यात निरक्षर कामगार ३३.७% (पुरूष - ३४% महिला- ३३.५%) तर साक्षर ४७.९% (पुरूष - ६२.३% व महिला-२९.९%) असून ग्रामीण भागात ६१.६% तर नागरी भागात ३९.७% आणि बेरोजगारीचा दर २.०% होता. सन २०१५-१६ मध्ये घेण्यात आलेल्या पाचव्या रोजगार व बेरोजगार पाहणीनुसार राज्यातील नित्य मुख्य कार्यस्थितीनुसार १५ वर्षा वरील

व्यक्तीसाठी श्रमशक्ती सहभाग दर ५२.७% कामकरण्याचे लोकसंख्येशी प्रमाण ५१.६% व बेरोजगारीचा दर २.१% होता.

महाराष्ट्र राज्यात एकूण लोकसंख्येशी मुख्यकाम करणाऱ्या लोकांची संख्या ३८.९४% आहे,तर कृषी क्षेत्रात कामकरणाऱ्या लोकांची संख्या ५२.७८% होती. यात कामकरणाऱ्या महिलाचा सहभागाचा दर ३१.०६% नोंदविण्यात आला होता. तसेच राज्यात बांधकाम कामगारांची संख्या ६.१% असून यांपैकी ९.८% शहरी भागात असून ३.९% हे ग्रामीण भागात असल्याचे नोंदविण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील कामगारांचे चार प्रकारात वर्गीकरण करण्यात आलेले आहे १) स्वयंरोजगार २) पगारदार/वेतनकर्मचारी ३) कंत्राटदार ४) प्रासंगीक वेतन कामगार. २०१३—१४ महाराष्ट्र शासनाच्या रिपोर्टनुसार कामगाराच्या स्थितीची पाहणी केली असता प्रति (०००) कामगाराचे वर्गीकरण केले असता ग्रामिण व शहरीभागात स्वयंरोजगार ५२८, पगारदार किंवा वेतन कर्मचारी २०९ तर कंत्राटदार कामगार २९,प्रासंगिक वेतन कामगार २३४ होते. याचप्रमाणे ग्रामीण भागात सर्वाधिक स्वयंरोजगार ६०४ होते तर प्रासंगिक वेतन कामगार २९१, वेतन कर्मचारी ८५ तर सर्वात कमी कंत्राटदार कामगार होते. तसेच शहरी भागात सर्वाधिक ४२५ वेतन कामगार असून स्वयंरोजगार ३९६, प्रासंगिक वेतन कामाचा १३४ तर सर्वात कमी ४५ कंत्राटदार कामगार होते.

२०१३—१४ महाराष्ट्र शासनाच्या रिपोर्टनुसार बांधकाम कामगाराची पाहणी (प्रति ०००) १५ वर्ष पूर्ण केलेल्या औद्योगिक कामगाराचे वर्गीकरण केले असता ग्रामीण व शहरीभागात ६१ बांधकाम कामगार असून शहरीभागात ९८ आहे. यापेक्षा कमी ग्रामीण भागात ३९ बांधकाम कामगार होते[५].

•बांधकाम कामगार अर्थ :

इमारतीच्या बांधकामाच्या सुरूवाती पासून म्हणजे अगदी खोदकामा पासून ते बांधकाम पूर्ण होईपर्यंत जे जे कामगार काम करतात त्यांना बांधकाम कामगार म्हणतात. १)खुदाई कामगार २) सेंट्रींग कामगार३) गवंडी कामगार ४) फिटींग

(फरशी, इलेक्ट्रिकल) ५) पेंटींग कामगार ६) फर्निचर, सुतार कामगार, ७) फॉब्रीकेटर्स ८) इतर.

• संशोधन विषयाची निवड :

मनव हा समाजशील प्राणी असून तो स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यााठी श्रमाची विक्री करतो. मानवाच्या श्रमावर राष्ट्राची प्रगती अवलंबून असते, त्याचप्रमाणे बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या मूल्याचा विचार केला तर मजुरीचे दर अतिशय अल्प, कामाच्या तासावर नियंत्रण नसते, नोकरीची शाश्वती नसते, अमानवी वागणूक, जास्तीच्या कामाचा मोबदला मिळत नाही, कामाच्या ठिकाणी कोणतीही सुविधा मिळत नाही, या कामगारात निरक्षरता अधिक असल्याने संघटनात्मक ऐक्य नसते, शासकीय कायदे व योजनाच्या माहितीच्या अभाव दिसून येत असल्याने व महाराष्ट्रात अद्याप अशा समस्यावर आधारित संशोधन न झाल्यामुळे ‘महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास’२०१०—११ ते २०१९—२० असा अभ्यास विषय निवडला आहे.

• संशोधन समस्या:

भारत सरकारला वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रन मिळवता आलेले नसल्याने वाढती लोकसंख्या स्थायी होण्यासाठी जंगलतोड करण्यात आली. त्याचा परिणाम शेती क्षेत्रावर झाला. प्रजन्यमानाचे प्रमाण कमी होऊ लागले, शेती क्षेत्राचे उत्पन्न घटलेत्या मूळे रोजगारात खंड निर्माण झाला.तसेच ग्रामीण भागात मजूरीचे दर कमी आहे आणि सामाजिक विषमता त्यामुळे हे कामगार शहरीभागाकडे रोजगाराच्या शोधात स्थलांतर करू लागले. सतत होणारे स्थलांतर पाहून शासना तर्फे ग्रामीण भागासाठी रोजगारा वर आधारीत अनेक योजना सुरू करण्यात आल्या, परंतु या योजनाचा फायदा मोठे शेतकरी व सरपंच यांच्या हितसंबंधातील नातेवाईकयांना होऊ लागला. अल्पभूधारक, सीमांत शेतकरी, शेतमजूररोजगाराच्याशोधात शहरीभागातस्थलांतर करू लागले आणि याप्रमाणात वाढ होत असल्यामुळे रोजगाराच्या शोधात शहरी भाग असल्याने या अकुशल कामगारांना बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराची

संधी उपलब्ध झाली. यामध्ये लेबर, प्लास्टर, मुन्शी, पेंटर,सेक्युरीटी गार्ड, मुकदम, खुदाईकामगार, सेंट्रीगकामगार, गवंडीकामगार, फींटींग, फरशीकामगार, लोखंडीकामगार, दगडफोडणारे कामगार, विटाबनवणारे कामगार इ. प्रकारची अकुशल कामे करत त्यामुळे त्यांना अधिक काम व अल्पमजूरी, जोखिमीच्या ठिकाणी काम करणे त्यातून जिवीतहानी आणि त्यांची भरपाई मिळत नसल्यानेत यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती ढासळते तसेच त्यांना कामाच्या ठिकाणी अपशब्द व अपमान-जनक वागणूक देण्यात येते. म्हणून सदर समस्या संशोधनासाठी घेतली आहे.

•उद्दिष्ट्ये :

१. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय कामगाराच्या संख्येच्या प्रमाणाचा अभ्यास करणे.
२. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक सुरक्षा व इतर योजनांचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील स्त्री —पुरूष कामगारांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगाराच्या स्थलांतराच्या कारणाचा शोध घेणे.
५. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने कामगाराच्या रोजगारावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
६. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
७. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करून निष्कर्ष व शिफारशी सुचवणे.

- **गृहितके :**

१. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांची संख्या वाढत आहे.
२. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी आहे.
३. महाराष्ट्रात ठाणे, पुणे, नाशिक या शहरात बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे.
४. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांना शासकीय योजनेचा लाभ अल्प कामगारांना मिळतो.
५. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या बाबतीत शासकीय धोरण उदासीन आहे.

- **संशोधन कालावधी, व्याप्ती व मर्यादा:**

महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास करताना संशोधन कालावधी २०१०—११ ते २०१९—२० असा सलग एकूण १० वर्षाचा कालावधी घेतला आहे.सदरील विषया वरील संशोधन विषयाची व्याप्ती ही महाराष्ट्रापुरती मर्यादित आहे. यामध्ये महाराष्ट्रातील इमारत बाधंकाम व इतरकामगार कल्याणकारी मंडळ शासकीय कार्यालयात नोंदणीकृत बांधकाम क्षेत्रातील कामगारापुरताच अभ्यास असूनही त्याची मर्यादा आहे.

- **संशोधन पध्दती :**

महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा सामाजिक, आर्थिक अभ्यास सदरील संशोधन हे वर्गीकरणात्मक पध्दतीवर अवलंबून असून या विषयावरील तथ्याचे संकलन करण्यासाठी प्राथमिक सामग्री संग्रहण प़्ध्दत व व्दितीयक सामग्री संग्रहणपध्दत या दोन्ही पध्दतीचे वापर केला जाणार आहे. यामध्ये व्दितीय सामग्रीमध्ये भारतसरकार, महाराष्ट्र शासन यांचे वार्षिक अहवाल, भारताची जनगणना, भारताची व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, भारत व महाराष्ट्रीय सांख्यिकीय अहवाल, संबंधीत कार्यालयाचे अहवाल, विविध मासिके, संशोधनसाहित्य, वृत्तपत्रे विविध माध्यमाचा आधार घेतला जाईल. प्राथमिक सामग्री संग्रहण पध्दती द्वारे प्रश्नावलीच्या सहाय्याने प्रत्यक्ष तथ्याचे संकलन करण्या येईल. यासाठी नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला असून सदरील नमुने हे बहुस्तरीय यादृच्छिक पध्दतीने(Multistage Randam

Sampling) निवडण्यात येणार आहेत. महाराष्ट्रात बांधकाम कामगार नोंदणी विभागीय आहेत. यामध्ये मुंबई व कोकण, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद अशा पाच विभागातून पाच शहरांची निवड खालील प्रमाणे केलेली आहे :

अ. क्र	विभागातीलनिवडलेले शहर	नमुनालाभार्थ्यांचीसंख्या	स्त्री	पुरूष
१	ठाणे	१००	५०	५०
२	पुणे	१००	५०	५०
३	अमरावती	१००	५०	५०
४	नाशिक	१००	५०	५०
५	औरंगाबाद	१००	५०	५०
	एकूण :	५००	२५०	२५०

संकलीत माहितीच्या विश्लेषणासाठी विविध सांख्यिकीय तंत्रांचा अवलंब केला असून यामध्ये सरासरी, वार्षिक वृध्दीदर, र्निदेशांक, आलेख तसेच spss याप्रणालीचा ही वापर करण्यात येणार आहे.

- **प्रकरणाची रूपरेषा :**

१. प्रस्तावना
२. संशोधन साहित्याचा आढावा
३. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था
४. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा अभ्यास
५. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांचा विभागीय व जिल्हानिहाय अभ्यास.
६. महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती
७. निष्कर्ष व शिफारशी

- **संदर्भ :**

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७—१८, अर्थ व सांख्यिकीय संचालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई.
2. Report On District Level Estimates For The State Of Maharashtra 2013-14 Government of India Ministry of Labour&EmployementLabourBero Chandigarh.
3. Timer Balls (1981) : "Plight of Railway Constrution Causal Labour" Economic and Political Weekly, Vol.16 No. 7m Feb. 14, PP 229-230.
4. Samita Seen (2008) : "Gender And Class : Women In the Construction Industry" Economic and Polictical Weekly Vol. 7 No. 11, March 11, PP 584-588.
5. Samita Seen (2008) : "Gender And Class : Women In the Construction Industry" Economic and Polictical Weekly Vol. 7 No. 11, March 11, PP 584-588.
6. www.wikipedis.org
7. https://jivani.org
8. www.wikipedio.org
9. https://mr.m. wikipeida.org
10. https://udyogishw.blogspot.com
11. https://mahabocw.in

संशोधक

गंगाधर लक्ष्मणराव गायकवाड

एम.ए. एम.फिल. (अर्थशास्त्र)

स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.शिवाजी पाते

सहाय्यक प्राध्यापक, संशोधक

मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभागप्रमुख

संत तुकारामकला व वाणिज्य

महाविद्यालय, परभणी